क्रमांक:- जमीन-२६८६/१८६१०९/
सीआर-१६६४/ग-९
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १४-७-१९८७.

विषय:- <u>जमीन : मुंबई उपनगर जिल्हा</u>.
सर्वे नंबर १३१/२ मौजे कांदीवली,
तालुका- बोरीवली या खाजगी
जमिनीलगतच्या शासकिय नाल्याच्या जमिनीवर
पूल बांधण्यास परवानगी देण्याबाबत -

<u>शासन ज्ञापन</u> :

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या पत्र क्रमांक सी/कार्यासन-३/जमीन-३/पाशि/५६१/८५, दिनांक ९ जानेवारी १९८७ च्या संदर्भात निदेशपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, मुंबई महानगरपालिकेने प्रस्तुत केलेल्या विकास आराखड्यातील तरतुदींनुसार बांधावयाचे जोड रस्ते व पूल बांधण्यासाठी शासकिय मालकीच्या नाल्याची ५२९.७५ चौ.मी. जमीन मेसर्स सॅन्डी फिल्टर्स [इंडिया] लि., महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड मुंबई-४०० ०२६ या लगतच्या सर्वे नंबर १३८/२ मधील खाजगी जमीन मालकास <u>५ वर्षांसाठी परवाना</u> पध्दतीने [लायसेन्सी] खाली दर्शविलेल्या दराने <u>परवाना फी आकारून</u> देण्यास, शासनाने वेळोवेळीच्या अटी व शर्तींवर व खाली नमूद केलेल्या विशेष अटींवर मंजूरी दिलेली आहे :-

१) सदर जमिनीचा उपयोग मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील तरतुदींनुसार फक्त जोड रस्ते व नाल्यावर पूल बांधण्यासाठी करता येईल व अन्य उपयोग करता येणार नाही.

२) या जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या पुलाचे काम व रस्त्याचे काम मुंबई महानगरपालिकेच्या देखरेखीखाली व महानगरपालिकेच्या स्पेसिफिकेशन-प्रमाणे केले पाहिजे. तसेच मुंबई महानगरपालिकेचे, समाधानकारक बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच, सदर पुलाचा रहदारीसाठी उपयोग करावा.

३) सदर पूल व रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यावर, मुंबई महानगरपालिका ज्यावेळी सदर रस्त्याचे व पुलाचे, तत्संबंधीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार, हस्तांतरण स्विकारील त्यावेळी सदर जमीन व त्यावरील रस्ते व पुल परवानाधारकाने शासनास विना तक्रार व कोणतीही नुकसान भरपाई व मोबदला परत करावयाची अट सदर परवानाधारकांवर घालण्यात यावी व तसे हमीपत्र परवानाधारकाकडून घेण्यात यावे.

..२..

४) जो पर्यंत सदर पूल व रस्ता परवाना धारकाच्या ताब्यात राहतील तो पर्यंत त्याची दुरुस्ती व देखभाल परवाना धारकाने स्वतःच्या खर्चाने करावी.

५) सदर जमिनीवर बांधण्यात यावयाचा पूल व जोडरस्ता आम जनतेस वापरासाठी खुला ठेवावा.

६) या जमिनीवर कोणतेही चटई क्षेत्र [एफ.एस.आय.] बांधकामासाठी उपलब्ध नाही.

७) वरील शर्तीच्या अधीन मुंबई महानगर पालिकेने सदर जोडरस्ते व पूल ताब्यात घेतला नाही तर त्यापुढील परवान्याची मुदत वाढ ही त्यावेळच्या शासनाच्या धोरणानुसार करण्यात यावी.

२.[१] सदर जमिनीचे परवाना शुल्क ठरविताना जमिनीच्या प्रचलित बाजार भावाच्या ८ टक्के दराने वार्षिक परवाना फी वसूल करावी. या जमिनीची प्रचलित बाजार भावाची किंमत नगररचना विभागाकडून निश्चित करून मिळेपर्यंत सदर जमिनीचा बाजारभाव रुपये २०४ प्रती चौ.मी. या प्रमाणे धरून भूईभाडे वसूल करावे. तसेच सदर जमिनीच्या चालू बाजार भावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई यांचेकडून निश्चित करून घेतल्यानंतर परवाना फीच्या फरकाची रकम व्याजासहित भरण्याबाबत परवाना धारकाकडून हमीपत्र घ्यावे.

[२] परवाना फी तथा प्रचलित बाजारभावाच्या ८ टक्के या दराने वसूल करण्यात येत आहे. त्यात वाढ झाल्यास त्या तारखेपासून परवाना धारकास शासकीय दराने परवाना फी भरावी लागेल व ही शर्त मान्य असल्याबाबत परवाना धारकाने हमीपत्र द्यावे.

३. सदर शासन नगर विकास विभागाच्या सहमतीने, तसेच वित्त विभागाच्या क्रमांक ओडीओ-१३७७/१६८/७७/व्यय-९ दिनांक २० जून १९७७ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

[ रा. गो. वर्तक ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

245

प्रति,

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई. (मोबाल संचिका)

आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

वित्त विभाग/व्यय-९,

सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग,
मुंबई.
नगर विकास विभाग,
निवड नस्ती, ग-९ कार्यासन, महसूल व वन विभाग.

एसजे/९/७

Scanned by CamScanner

क्रमांक : सी/कार्यासन-३/जमिन-३/वाशी-५६१-८५

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई उपनगर जिल्हा, दुसरा माळा,
जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३

दिनांक: ७ ७ ऑगस्ट १९८७

वाचा : १] शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमिन-२६८६-१८६१०९-सीआर १६६४-ग-९ दिनांक १४.७.१९८७.
२] अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा पत्र क्र. सम दिनांक - २४.७.१९८७.
३] श्री. आर.डी.गांधी आणि इतर मुखत्यार, मे.कॅण्डी फिल्टर्स [इंडिया] लि. यांचे पत्र दिनांक २७.७.१९८७.
४] श्री आर.डी.गांधी आणि इतर मुखत्यार मे.कॅण्डी फिल्टर्स [इंडिया] लि. यांचे पत्र दिनांक ४.८.१९८७

<u>आ दे श</u> :-

वरील वाचले सदरांत नमुद केलेल्या कागदपत्रांचे संदर्भात मुंबई महानगर पालिकेने प्रस्तुत केलेल्या विकास आराखड्यातील तरतुदीनुसार बांधावयाचे जोड रस्ते व पूल बांधण्यासाठी शासकिय मालकीच्या नाल्याची ५२९.७५ चौ.मी. जमिन मे.कॅण्डी फिल्टर्स [इंडिया] लि, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ या लगतच्या सर्वे नंबर १३१/२ मौजे कांदिवली या खाजगी जमिन मालकास ५ वर्षासाठी परवाना पध्दतीने [लायसेन्सी] तात्पुरती वार्षिक परवाना फी रक्कम रुपये ९३९९/- [ रक्कम रुपये नऊ हजार तीनशे नव्याण्णव मात्र ] आकारुन व खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीवर मंजूरी देण्यांत येत आहे.

१] तदर जमिनीचा उपयोग मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील तरतुदीनुसार फक्त जोड रस्ते व नाल्यावर पूल बांधण्यासाठी करता येईल व अन्य उपयोग करता येणार नाही.

२] या जमिनीवर बांधण्यात येणा-या पुलाचे काम व रस्त्याचे काम मुंबई महानगर पालिकेच्या देखरेखीखाली व महानगर पालिकेच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे केले पाहिजे. तसेच मुंबई महानगर पालिकेचे समाधानकारक बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच सदर पुलाचा रहदारीसाठी उपयोग करावा.

३] सदर पूल व रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्याबर मुंबई महानगरपालिका ज्यावेळी सदर रस्त्याचे व पुलाचे तत्संबंधीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६ मधिल तरतुदीनुसार हस्तांतरण स्विकारील त्यावेळी सदर जमिन व त्यावरील रस्ते व पुल परवानाधारकाने शासनास बिना तक्रार व कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करावी. [ सदर अटीकामी

.. २ ..

परवाना धारकाने रक्कम रुपये १०/- चे स्टँपपेपरवर हमीपत्र दिनांक २२.५.८७ रोजी दिले आहे.]

४] जो पर्यंत सदर पुल व रस्ता परवाना धारकाच्या ताब्यांत राहील तो पर्यंत त्याची दुरुस्ती व देखभाल परवाना धारकाने स्वत:च्या खर्चाने करावी.

५] सदर जमिनीवर बांधण्यांत यावयाचा पुल व जोडरस्ता आम जनतेस वापरासाठी खुला ठेवावा.

६] या जमिनीवर कोणतेही चटई क्षेत्र [एफ.एस.आय] बांधकामासाठी उपलब्ध नाही.

७] पांच वर्षाच्या अवधीत मुंबई महानगरपालिकेने सदर जोडरस्ते व पूल ताब्यांत घेतला नाही तर त्यापुढील परवान्याची मुदत वाढ ही त्यावेळच्या शासनाच्या धोरणानुसार करण्यांत यावी.

८] प्रस्तावित जोडरस्ता व पूल बांधण्याकामी परवाना धारकाकडून तात्पुरती वार्षिक परवाना फी रक्कम रुपये १३९९/- वसूल करावी. तसेच शासन प्रश्नाधिन जमिनीचे जे मुल्यांकन ठरवील ते विनातक्रार स्विकारुन फरकाची रक्कम व त्यावर शासन निश्चित करेल त्या दराने व्याज परवाना धारकाकडून वसुल करण्यांत यावे. [सदर अटीकामी परवाना धारकाने रक्कम रुपये १०/- चे स्टँपपेपरवर हमी पत्र दिनांक २२.५.८७ रोजी दिले आहे.)

सही/-
अप्पर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
श्री.आर.डी.गांधी, व इतर,
मुखत्यार,
मे कॅन्डी फिल्टर्स [इंडिया] लि.
सी-५ सह्यगिरी सामंतवाडी
सोनावाला रोड, गोरेगांव[पुर्व]
मुंबई ४०० ०६३.

त्यांना विनंती करणेत येते की, जागेचा ताबा घेणेसाठी त्यांनी जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी क-६ मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे संपर्क साधावा.

स्थळप्रतीवर अपर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

[signature] २२/८
अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता.
२२/८/८७

क्रमांक: जमीन-१९९३/११२०६१/प्र.क्र.४४१३/ज-३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २३ फेब्रुवारी, १९९४

विषय:- जमीन-मुंबई उपनगर जिल्हा
स.नं. १३१/२ मौजे कांदिवली तालुका बोरीवली या खाजगी जमिनीजवळील शासकीय नाल्याच्या जमिनीवर पूल बांधण्यास परवानगी दिल्याबाबत व पुढे मुदतवाढ मिळण्याबाबत...

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांना त्यांच्या क्र. ६२/कडी एल-०१३, दिनांक २२.४.१९९३ च्या पत्रासंदर्भात विज्ञप्तिपूर्वक कळविण्यात येते की, मे. इन्डो फिल्टर्स [इंडिया] यांना शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२६८६/१८६३२२/प्र.क्र.१६६४/ग२, दिनांक १४.६.१९८७ अन्वये शासकीय नाल्याची ५२९.७५ चौ.मी. जमीन रस्ता व पूल बांधण्याकरिता ५ वर्षांच्या भाडेपट्ट्याने काही अटी/शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे. सदर भाडेपट्ट्याची दिनांक १.२.९३ रोजी संपलेली मुदत त्या जमिनीची नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाकडून ठरविल्या जाणाऱ्या दिनांक १.२.१९९३ रोजीच्या पूर्ण बाजार भावाच्या किंमतीच्या १५टक्के इतके प्रतिवर्षी भाडे आकारून उपरोल्लिखित शासन ज्ञापनातील अटी/शर्ती तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अन्य अटींवर ५ वर्षांकरिता पुढे वाढवून देण्यास शासन मंजुरी देत आहे.

8002

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

OFFICE OF THE COLLECTOR BOMBAY SUBURBAN DIST. Dt. 25/12/95

III-D

(स्वाक्षरी)
[द. शि. फाटक]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति:- जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, बी.एम.आर.डी. इमारत, वान्द्रे (पू) मुंबई-४०००५१

प्रत माहितीसाठी सविनय अग्रेषित:-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर
३) सहायक संचालक नगररचना व मूल्य निर्धारण, विभाग, मुंबई
४) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवड नस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग

222/23

Scanned by CamScanner

क्र.१९/कावि/एल-०१४.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
डॉ.बी.आर.डी.बी.इमारत ३ रा माळा,
वांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

दिनांक :- २५ एप्रिल,१९९४.

वाचा :-

१) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमिन/१९८८/१८१०८/ सीआर-१९९४/ग-२/दि.१४.७.८०.
२) या कार्यालयाचे आदेश क्र.सी/कार्या-३ जमिन-२/कवी-५११/८५ दिनांक ११.८.८७..
३) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमिन/१९९३/११९०६६/प्र.क्र.-४५१०/ज-१ दिनांक २२.२.१९९४..

आदेश :-

मे.इन्डो फिल्टर्स (इंडिया) यांना या कार्यालयाचे आदेश क्र.सी/कार्यासन-३/जमिन-२/कवी-५११/८५ दि.११.८.८७ अन्वये मौजे कोंडिवली न.भू. १३१ हि.नं.२ या त्यांच्या जागेवर जाण्यासाठी शासकीय जागेतील ५५६.०५चौ.मी. जमिन रस्ता व पूल बांधण्याकरिता ५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने काही अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे. सदर भाडेपट्ट्याची दि.१.२.९१ रोजी संपलेली मुदत त्या जमिनीची नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाकडून ठरविल्या जाणा-या दि.१.२.९१रोजीच्या पूर्ण बाजार भावाच्या किंमतीच्या १५टक्के इतके प्रतिवर्षी भाडे आकारून देण्यास शासन ज्ञापन क्र.जमिन-१९९३/११९०६६/प्र.क्र.-४५१०/ज-१ दि.२२.२.१९९४ द्वारे दिलेल्या मंजूरीनुसार खालील अटींवर दिनांक १.२.१९९१ पासून ५वर्षाकरिता पुढे वाढवून देण्यात मंजूरी देण्यात येत आहे.

१) नगर रचना मुल्यनिर्धारण विभागाकडून प्रस्तुत जमिनीचे मुल्यांकन प्राप्त होईपर्यंत प्रश्नाधिन जमिनीचे प्रती चौ.मी. रु.३६०/-प्रमाणे तात्पुरत्या मुल्यांकनावर आधारीत पूर्ण बाजारभावाच्या १५टक्के इतके प्रतिवर्षी तात्पुरते वार्षिक भाडे रु.३०,०१८/- देय राहील.

२) प्रश्नाधीन जमिनीचे जे अंतिम मुल्यांकन नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाद्वारे निश्चित करण्यात येईल ते वरील तात्पुरत्या मुल्यांकनापेक्षा जास्त आल्यास त्यातील भुभाड्याच्या फरकाची रक्कम व्याजासह वसूल करण्यात येईल हे मान्य व बंधनकारक असल्याबाबतचे मुद्रांकित हमीपत्र पट्टेधारक यांनी सादर करावे.

३) उद्देशिलेले उल्लेखित क्र.२ मधील या कार्यालयाचे आदेश दि.११.८.८७ मधील अटी व शर्ती कायम राहतील.

प्रति,

बी.आर.डी. गांधी व इतर
मुखत्यार
मे.इन्डो फिल्टर्स(इंडिया)लि.२४ निवृत्ती आरे रोड
गोरेगाव (पूर्व) मुंबई ४०००६३.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा
कृ.मा.प.ता.